**का.नु.भ. अर्ज क्र.०९/सी—४/२०२१**
**निशाणी क्रं. सी—१४**

**अर्जदारातर्फे ॲड. श्री.एस.डी.साळोखे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

माझे बीई पर्यंत शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा गन मेटल आणि ॲल्युमिनीअम कास्टींगचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे धनंजय इंडस्ट्रीजमध्ये कामगारांची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे नाही की, मयत राहूल लक्ष्मण सासवडे हा माझेकडे कामगार म्हणून काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, मयत राहूल लक्ष्मण सासवडे हा धनंजय मेटल वर्क्स कडे कामगार म्हणून काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, मयत राहूल लक्ष्मण सासवडे हा आमच्याकडे काम करीत होता त्यास आम्ही दरमहा रू. १४,०००/— पगार देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, तसे आम्ही राहूल लक्ष्मण सासवडे यांना पत्र दिले होते. आता मला दिनांक २८/१२/२०१९ चे पत्र दाखवले त्यामधील पत्ता बरोबर आहे. सदरचा पत्ता धनंजय मेटल वर्क्सचा असेल याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८/१२/२०१९ च्या पत्रावर मी स्वत: सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/१०/२०२० राहूल लक्ष्मण सासवडे हा आमच्याकडे कामाला आला होता. दिनांक ०३/१०/२०२० रोजी राहूल लक्ष्मण सासवडे  हा घरी आला नाही म्हणून त्याच्या फोनवर त्याचे कुटूंबीय फोन करीत होते याबाबत मला माहिती नाही. त्याचप्रमाणे दिनांक ०४/१०/२०२० त्याचे कुटूंबीय फोन करीत होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत राहूल लक्ष्मण सासवडे  यांचा मोबाईल आमच्या इंडस्ट्रीमध्ये होता. हे म्हणणे खरे नाही की, मयत राहूल लक्ष्मण सासवडे  यांच्या घरी आमच्या कारखान्यातून कळवण्यात आले होते की त्याला हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. राहूल लक्ष्मण सासवडे बेशुध्द अवस्थेत होता याबाबत मला माहिती नाही. राहूल लक्ष्मण सासवडे यास शासकीय रूग्णालयातून सावित्रीबाई फुले रूग्णालयात दाखल केल्याचे माहिती नाही. मयत राहूल लक्ष्मण सासवडे याच्या मृत्यूप्रमाणपत्रावरून तो मयत झाल्याचे कळाले. हे म्हणणे खरे नाही की, राहूल लक्ष्मण सासवडे हा आमच्याकडे कामावर असताना अपघात होवून मरण

पावला आहे. राहूल लक्ष्मण सासवडे यांच्या मोबाईलमधील दिनांक ०३/१०/२०२० ते ०६/१०/२०२० पर्यंतचे कॉल डिटेल्स डिलीट केले होते याबाबत मला माहिती नाही. राहूल लक्ष्मण सासवडे हा स्क्रबचा व्यवसाय व विक्री करीत होता याबाबतचा पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, राहूल लक्ष्मण सासवडे हा स्क्रब विक्रेता नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, राहूल लक्ष्मण सासवडे हा आमच्याकडे काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, राहूल लक्ष्मण सासवडे व आमच्यामध्ये मालक व कामगार नाते नव्हते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, राहूल लक्ष्मण सासवडे यांचा मृत्यू आमच्याकडे कामावर असताना व काम करीत असताना झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई टाळण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

(के. बी. कामगौडा)
आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई तथा
न्यायाधीश, कामगार न्यायालय क्रं.२ कोल्हापूर.

कोल्हापूर.
दिनांक : ०३/१२/२०२५